सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~ सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. तात-१/९३ ठ. क्र. ९३३ दि. १२/८/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव ~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-१/९३

सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणारे हेडवर्क्स व जलशुध्दीकरण केंद्राकडे शस्त्रधारी सुरक्षा रक्षक व पंप हाऊस व पाण्याचे टाक्या येथे निशस्त्रधारी सुरक्षा रक्षक नेमणेकामी प्रस्तावात नमूद कारणास्तव सोलापूर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्राच्या हद्दीत सध्या एकूण ३२ ठिकाणी पाण्याचे टाक्या असून, सदर ठिकाणी तीन शिप्टमध्ये ३ सुरक्षा रक्षक प्रमाणे ९६ निशस्त्रधारी सुरक्षा रक्षक, शहरातील सुमारे ११ पंप हाऊसच्या ठिकाणी तीन शिप्टमध्ये ३ सुरक्षा रक्षक असे ३३ निशस्त्रधारी सुरक्षा रक्षक व उजनी-पाकणी, टाकळी, सोरेगांव व भवानी पेठ या ठिकाणी ३ शिप्टमध्ये १५ शस्त्रधारी असे एकूण १३५ निशस्त्रधारी सुरक्षा रक्षक व १५ शस्त्रधारी सुरक्षा रक्षक नेमणे आवश्यक आहे. सदरकामी ऑफिस ऑफ द चिफ लेबर कमीशनर न्यु दिल्ली यांचेकडील नं. 1/17 (7) 2015-CS-II प्रमाणे शस्त्रधारी सुरक्षा रक्षक यांना प्रति दिवस रु. ३८५/- व निशस्त्रधारी सुरक्षा रक्षक यांना प्रति दिवस रु. ३२८/- याप्रमाणे वेतन देणेचे नमूद आहे. याप्रमाणे पाहात सोमपाकडे निशस्त्रधारी १३५ सुरक्षा रक्षकासाठी रु. ३२८/- प्रमाणे प्रति वर्षाकरिता र.रु. १,६१,६२,२००/- व शस्त्रधारी १५ सुरक्षा रक्षकासाठी र.रु. ३८५/- प्रमाणे प्रति वर्षाकरिता २१,०७,८७५/- इतका असे एकूण र.रु. १,८२,७०,०७५/- म्हणजेच रुपये १.८३ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. दरम्यान सदरचे कामासाठी जाहिर प्रसिध्दीकरणाने दर मागणी केले नंतर प्रत्यक्षात येणारे दरानंतर सदरचे खर्चात बदल होणे शक्य आहे. तरी सोलापूर शहरास पाणी पुरवठा करणारे हेडवर्क्स व जलशुध्दीकरण केंद्राकडे शस्त्रधारी सुरक्षा रक्षक व पंप हाऊस व पाण्याच्या टाक्या येथे निशस्त्रधारी सुरक्षा रक्षक नेमणेकामी धोरणात्मक निर्णय होणेस व सदरकामी र.रु. १.८५ कोटीचे बजेट तरतूद होऊन मिळणेस मा. सर्व साधारण सभेची मान्यता मिळणेस्तव मा. आयुक्त यांचे दि. ११-६-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

म.न.पा.च्या आस्थापनावरील शिल्लक पडणा-या रक्कमेतून या खर्चाची तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/ग्रामुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज..६३..ठ. क्र.१३४
दि..१२/६/१५......रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



दैनंदिन, नागरिक, कंपनी व मासिक पासेसच्या दरामध्ये अल्पसा बदल करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव आजला सो.म.पा. परिवहन उपक्रमाकडे शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांच्या व प्रवाशांच्या सोयीस्तव तसेच उपक्रमास सुरुवातीसच एकवट उत्पन्न मिळावे या उद्देशाने विषयामध्ये नमूद केलेल्या पासेसची विक्री करणेची कार्यवाही ठेवली जाते. त्यामध्ये सध्या दि. ११-८-२०१४ पासून तिकीट दरवाढ करतेवेळेस प्रस्तावात नमूद १ ते ५ दराप्रमाणे पासेसची विक्री केली जात आहे. दि. ११-८-२०१४ पासून पासेसच्या दरामध्ये वाढ केल्यामुळे पासेसच्या संख्येत घट होवून उपक्रमाच्या उत्पन्नात घट आलेली आहे ही वस्तुस्थिती आहे. मा. विरोधी पक्षनेते, परिवहन समिती सो.म.पा. यांनी पत्र देवून प्रस्तावात नमूद १ ते ११ पासेसच्या दरामध्ये बदल करुन पासेस वितरीत करणेची कार्यवाही ठेवावी जेणेकरुन उपक्रमाच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. त्याअनुषंगाने दैनंदिन, नागरिक, कंपनी व मासिक पासेसच्या दरामध्ये अल्पसा बदल करुन पासेस वितरीत करणे आवश्यक असून त्यामुळे पासेसच्या संख्येमध्ये वाढ होवून उपक्रमाच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यास्तव प्रस्तावात नमूद दैनंदिन, नागरिक, कंपनी व मासिक पासेसच्या १ ते ११ या नियमावलीनुसार सुधारीत दराप्रमाणे दराच्या अंमलबजावणीचे अवलोकन होऊन सदरचा प्रस्ताव प्रायोगिक तत्वावर मान्यतेस्तव मा. परिवहन समितीची कार्योत्तर मान्यतेअंती मा. सर्वसाधारण सभेकडे माहितीस्तव सादर करणेकामी मा. परिवहन व्यवस्थापक यांचे दिनांक २९-५-२०१५ चे टिपणीप्रमाणे सदरची बाब माहितीस्तव मा.म.न.पा.कडे सादर करणेस मा. परिवहन समिती ठराव क्र. १७, दिनांक ३०-५-२०१५ चे शिफारशीने आलेल्या प्रकरणास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रासुली/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...६०...ठ. क्र...९३५
दि...२२/६/१५.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजना (जिल्हास्तर) अंतर्गत राठी टेक्स्टाईल ते महालक्ष्मी मंदिर करणे कामापैकी प्रस्तावात नमूद कारणास्तव एकता नगर चौक ते महालक्ष्मी मंदिर पर्यंतच्या भागात हायटेंशन लाईन शिप्टींग करणे अवघड व खर्चिक असलेने तसेच या कामास बराच कालावधी लागणेचे शक्यता असलेने रस्त्याचा हा भाग १८.० मी. ऐवजी १२.० रस्ता ३.० मी. कॅरेज वे फुटपाथ असा मिळून १५.० मी. रुंदीने विकसीत करणेकामी धोरणात्मक मान्यतेस्तव प्रकरण मा. सर्वसाधारण सभेपुढे सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ३१-५-१५ चे टिपणी प्रमाणे आलेल्या प्रकरणाचे अवलोकन केले.

सदरचे प्रकरण दप्तरी दाखल करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रामुलो/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ७९ ठ. क्र. १३६
दि. १२/८/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



प्रभाग क्र. ३० अ येथे नवयुग जांबवीर तरुण मंडळ, मधुकर उपलप वस्ती, सोलापूर रजि. १८५६ एफ, या मंडळाने अनेक वर्षापासून कबड्डी या खेळात अनेक राष्ट्रीय खेळाडू निर्माण केले असून, नवयुग जांबवीर तरुण मंडळ हे सोलापूर शहरातील नावाजलेले मंडळ असून, या मंडळाने स्वातंत्र्यपूर्व काळापासून सर्व्हे नं. ९/२५ या जागेत कबड्डी सामने भरविणे व मंडळाचे खेळाडू नियमीत दररोज क्रिडांगणावर कबड्डी सराव करत असतात. सर्व्हे नं. ९/२५ हे गार्डनचे आरक्षण असून, येथून जवळच नॅशनल पार्क सारखे मोठया गार्डनची सोय नागरिकांसाठी उपलब्ध आहे. मात्र या परिसरामध्ये जवळपास कोठेही क्रिडांगणाची सोय नसल्याने या त्रिकोणी असलेले गार्डनच्या आरक्षित जागेवर कबड्डी या खेळासाठीच क्रिडांगण आवश्यक असल्याने सदरची जागा नवयुग जांबवीर तरुण मंडळ या मंडळास नाममात्र भाडयाने सदरची क्रिडांगणाकरिता देण्यास मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मान्सून~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ...७७...ठ. क्र...१३७...
दि...२२/६/१५...रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

जोडभावी पेठ, मंगळवार बाजार येथे आधुनिक मत्सबाजार पेठ उभारणे, मंगळवार बाजार येथे काँक्रीटींग, बोअर, ओपन गटार व ड्रेनेजची कामे करणेबाबत प्रस्तावात नमूद कारणास्तव सदरची कामे तातडीने करणे जरुरीचे असल्याने, विषयातील र.रु. १२,८७,३६७/- इतक्या रक्कमेचे काम तातडीने हाती घेणे गरजचे असल्याने मुं.प्रां.महा.अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त यांचे मान्यतेने सदरचे काम अशा प्रकारची कामे करणारे मक्तेदार श्री. बी. ए. बागवान यांचेकडून मक्ता रक्कमेपेक्षा १ % कमी दराने करुन घेणेस व सदरची बाब मा. स्थायी समिती मार्फत मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ५-५-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. स्थायी समिती ठराव क्र. ८४ दि. ५-६-१५ चे शिफारशीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका.

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/प्रासंगीक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ६९ ठ. क्र. ९३५
दि. २२/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

वि.क्र.६, प्र.क्र. ११ भजन कोटरी येथील सार्व.कट्टा सुधारणा करणे देशमुख पाटील वस्ती छत्रपती शिवाजी महाराज पुतळालगत सुधारणा करणे कामाचे पूर्वगणनपत्रक क्र.-/२०१४-१५ र.रु. १,९९,४८१/- यांस तांत्रिक मान्यता मिळणेकामी, जागा मालकी खाजगी असल्याने, मा. स्थापत्य समितीची शिफारस होऊन मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेकामी मा. सहा. आयुक्त (स) यांचे दि. १२-५-२०१५ चे टिपणीप्रमाणे मा. स्थापत्य समिती ठराव क्र. २०, दि. ८-६-२०१५ चे शिफारशीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ८० ठ. क्र. १३९
दि. २२/६/१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

८०

स्थानिक संस्था कर अभय योजना -२०१५ बाबत मा. महाराष्ट्र शासनाने, महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम-२०१५ (सुधारीत) मधील नियम ४८ (९) (अ) नुसार स्थानिक संस्था कर अभय योजना -२०१५ अधिसूचना क्र. स्थासंक/२०१५/प्र.क्र.८२/२०१५ नवि-३२ दि. ३ जून २०१५ ने अधिसूचित केलेली आहे. सदर अधिसूचनेची माहिती मा. सर्वसाधारण सभेपुढे माहितीस्तव सादर करणेकामी मा. आयुक्त यांचे दि. ५-६-१५ चे टिपणीने आलेल्या प्रकरणाची माहिती घेतली.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.अ. ८१ ठ. क्र. १४० दि. १२।८।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

प्र.क्र. ३६ मधील अशोक चौक परिसरातील कय्युम बु-हाण यांचे घरापासून ते सय्यद हवालदार यांचे घरापर्यंत, सय्यद हवालदार यांचे घरापासून ते सोमनाथ सिमेंट डिलर पर्यंत, सोमनाथ सिमेंट डिलर पासून ते सुरवसे बिल्डींग पर्यंत, सुरवसे बिल्डींग ते कय्युम बु-हाण यांचे घरापर्यंत असलेल्या परिसरास छत्रपती संभाजी नगर असे नामकरण करणेस, नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/मासिक/विशेष
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज....८८....ठ. क्र....१४९
दि...९३।८।१५.....रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.

८८

श्री. सादिक महंमद हनीफ शेख, राहणार बी २/२ पोस्टल कॉलनी, सिव्हील लाईन, सोलापूर यांचा मुलगा मोहसीन सादिक शेख वय वर्षे २७ हा पुण्यामध्ये आय.टी. कंपनीमध्ये नौकरीस होता. त्याची दिनांक २ जून २०१४ रोजी रात्रौ ९.३० वाजता जातीयवादी संघटनेच्या वतीने गैरसमजुतीतून आमानुषपणे मारहाण करुन निर्घुण हत्या केला असून, घरातील एकमेव कर्ता असल्याने त्याच्या कमाईवरच त्यांच्या कुटूंबाची उदरनिर्वाह होत होता. तसेच त्यांना आणखी एक लहान मुलगा असून त्याचे शिक्षण बीकॉम पर्यंत झाले आहे. आणि तो बेरोजगार आहे. श्री. सादिक महंमद हनीफ शेख हे वृध्द असून त्यांना कोणाचाही आधार नाही. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असून, महानगरपालिकेकडून जास्तीत जास्त आर्थिक मदत देणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देणेत येत आहे.

नगर सचिव
सो. महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~आमसो/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र. ८५ ठ. क्र. ९४२
दि. १२।८।१५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

८५

श्री उमेश कोळेकर, वृत्तवेध चॅनलचे प्रतिनिधी पत्रकार हे दिनांक ४/५/२०१५ रोजी नांदणी येथील सोलापूर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाच्या बी.पी.टी. च्या कामाची पाहणी व चित्रीकरण करीत असताना श्री उमेश कोळेकर यांचा अपघात होऊन त्यांच्या पायांना गंभिर दुखापत झाल्याने त्यांच्यावर सोलापूरातील अश्विनी रुग्णालयात औषधोपचार चालू असून त्यांचे पायाचे ऑपरेशन करण्यात आले आहे. श्री उमेश कोळेकर यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत गरिबीची असून त्यांना उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. तरी श्री उमेश कोळेकर यांना सोलापूर महानगरपालिके कडून जास्तीत जास्त वैद्यकीय आर्थिक मदत देण्यास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. महापौर यांना अधिकार देण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~मासिक~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ८९ ठ. क्र. १४३
दि. २२/८/२४ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

पूर्व विभागातील माजी नगरसेवक व कर्तबगार व्यक्ती रामलिंग मलय्या नराल यांचे समाजकार्य पाहता त्यांचे युवाशक्तीला आठवण राहण्यासाठी त्यांचे नांव जोडभावी पेठ ते नेताजी नगर येथील डॉ. कोंडा घर ते वडलाकोंडा यांच्या रस्त्यास कै. रामलिंग मलय्या नराल असे नामकरण करणेस तसेच नामफलक लावणेस व येणा-या खर्चास मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान कमिटीकडे निर्णयास्तव पाठविण्यांत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या तहकूब/~~खास~~/~~विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे विषय क्र.ज. ९० ठ. क्र. १४४
दि. १२/८/९५ रोजी ठेवता खालील प्रो. ठराव
बहुमताने/सर्वानुमते पास झाला.



बुधवार पेठ व परिसर हा भाग दाट झोपटपट्टी व दलित वस्तीचा भाग आहे. या भागामध्ये महापालिकेचे एकही सांस्कृतिक भवन या परिसरात उपलब्ध नाही. तरी या परिसरातील **१) मातंग वस्ती प्लॉट नंबर १८ २) मातंग वस्ती प्लॉट नं. १७ व ३) थोरला राजवाडा (मिलींद नगर) बुधवार पेठ** येथे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत प्रत्येकी एक सांस्कृतिक भवन बांधणेत यावे. याकामी प्लॅन व एस्टीमेट तयार करुन मा. जिल्हाधिकारी, सोलापूर यांचेकडे मंजूरीस्तव सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

तसेच सोलापूर शहरामध्ये ज्या ज्या ठिकाणी दलित वस्तीचा भाग आहे अशा ठिकाणी सांस्कृतिक भवन बाधणेकामी सर्व्हे करुन, प्लॅन व एस्टीमेट तयार करुन मान्यतेस्तव म.न.पा.सभेकडे सादर करणेस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिका [illegible] ~~प्राथमिक/विशेष~~
सर्व साधारण सभेपुढे [illegible] ९९ ठ. क्र. १४५
दि. १२/८/१५ [illegible] ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.



जुना कारंबा नाका येथील चौकास जयभीम चौक असे नामकरण करणेस व सम्राट चौक ते जुना कारंबा नाका या मार्गास सद्‌गुरु प्रभाकर महाराज मार्ग असे नामकरण करणेस, येणारे खर्चास व नामफलक लावणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका

सोलापूर महानगरपालिकेच्या [illegible]/~~तहकूबी/खास~~
सर्व साधारण सभेपुढे [illegible] तात-3/९५ ठ. क्र. ९३६
दि. ९/८/९५ रोजी [illegible] झालेली प्रो. ठराव
~~बहुमताने~~/सर्वानुमते पास झाला.

तात-३/९५

सोलापूर रेल्वे रुळाखाली नव्याने लोकांचा जाणे येणेसाठी सो.म.न.पा.चे खर्चातून बोगदा केलेला आहे. सदर बोगद्यास **गंगामाता बोगदा** असे नामकरण करणेस मान्यता देणेस्तव आलेल्या प्रस्तावाचे अवलोकन केले.

मा. नामाभिदान समितीकडे पाठविण्यांस मान्यता देणेत येत आहे.

नगर सचिव
सोलापूर महानगरपालिका